Friday, January 10, 2025
12:01 PM

# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  १०/०१/२०२५

दुखापत

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | आरोपी अटक आहे/ नाही | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे नापुरी गेट अमरावती अप क्र 06/25 कलम 118(1),352, 3 (5) बीएन | उस्मान नगर अमरावती | दि. 09/01/2025 चे 13/00 वा दाखलदि. 09/01/2025 चे 19/38 वा | मोहम्मद रेहान मोहम्मद साजीक वय 22 वर्ष रा. उस्मान नगर अमरावती | 1)जावीर शहा 2) जावेद शाहा दोन्ही रा उस्मान नगर अमरावती | नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्याही हे आपले घरा समोर उभे होते त्याचे घरा समोर सिमेट क्राँक्रीटचा रोडचे काम झाले परंतु त्याचे घरा समोर गड्डे तसेच आहे म्हणुन तेथे रोडच्या कामाला पाणी टाकण्या करिता आलेल्या ईसमास फिर्यादीने म्हटले की, मी ठेकेदारला हे गड्डे बुजविण्या करिता सांगितले होते परंतु त्यांनी ते काम केले नाही वरुन त्या इसमाने फिर्यादीस म्हटले की, ते तुम्हीच ते गड्डे भरुन घ्या त्यावर फिर्यादीने त्यास म्हटले की, याहापर गड्डे भरने के लिए मिट्टी तो नही है सब चोरेने चुरा कर लेगये असे म्हटले असता तेथे मोहल्या राहणारा आरोपी क्र 1 यास वाटले की, फिर्यादीने त्यांस चोर म्हटले वरुन आरोपी क्र 1 व 2 यांनी फिर्यादीस |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | एस 2023 | | | | | | शिवीगाळ करने सुरु केले तेव्हा फिर्यादीने आरोपीतांना म्हटले की, मी तुम्हाला नाही म्हटले तर आरोपी क्र 1 याने तेथे पडलेली वीट उचलुन फिर्यादीचे डोक्याला फेकुन मारली व आरोपी क्र 2 याने लाथा बुक्याने मारहान केली त्यामळे फिर्यादीचे डोक्याला मार लागल्याने डोक्याचे रक्त निघुन चक्कर आली तेव्हा आरोपी तेथुन पळुन गेले व त्याचे मोठा भाऊ मोहम्मद अदनाम यांनी फर्यादीस पो.स्टे ला आणले त्यांना उपचारा करिता जिल्हा सामान्य रुग्नालय अमरावती येथे नेले असत डॉं सानी फिर्यादीस उपचारा करिता भर्ती करुन घेतले अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | चोरी गेला माल/ मिळाला माल | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती शहर अपक्र. २८/२०२५ कलम- ३०५(बी) बीएनएस | जर्णारपण हाँस्पीटल अमरावती | दि. ८/१/२०२५ चे १४.०० वा दि. ९/१/२०२५ चे १६.४१ वा | एक महीला | अज्ञात | नगदी ३०००/- रु व एक जुना वापरता पोको कम्पनीचा मोबाईल कि.अ. ३०००/-रु<br><br>एकुन ६०००/-रु चा माल | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठिकानी यातील फिर्यादी नमुद ठिकानी कामाला असुन ती नमुद वेळी कामावर हजर असताना फिर्यादीने तिच्या जवळील पर्स त्यामध्ये नगदी ३०००/- रु व एक जुना वापरता पोको कम्पनीचा मोबाईल कि.अ. ३०००/-रु  असा रुम मध्ये ठेवला असता तो कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला. अशा फिर्यादी च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## प्राणांतिक अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | आरोपी अटक आहे/ नाही | मृतकाचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. बडनेरा, अम. अप.नं. ०९/२०२५ कलम ३०४अ भा. दं. वि. | डॉं. धुरतकर हॉस्पिटल, जुनी वस्ती, बडनेरा. | दि. १४.०८.२०२३ चे १६.०० वा.<br><br>दाखल ता. वेळ - दि. ०९.०१.२०२५ चे २२.३० वा. | सरतर्फे पोउपनि. सुरेंद्र पाटील, पो. स्टे बडनेरा, अम. शहर. | डॉं. नंदकिशोर लक्ष्मणराव धुरतकर, वय ७० वर्षे, रा. जुनी वस्ती, बडनेरा. | नाही. | तेजस नंदु मेश्राम, वय १६ वर्षे, रा. बारीपुरा, जुनी वस्ती, बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, दि. १४.०८.२०२३ रोजी १६.०० वा. चे सुमारास तेजस नंदु मेश्राम, वय १६ वर्षे, रा. बारीपुरा, जुनी वस्ती, बडनेरा याला त्याचे राहते घरी अचानक ताप येऊन प्रकुती खराब झाल्याने त्यास उपचाराकरिता डॉं. धुरतकर , जुनी वस्ती बडनेरा येथे नेले व त्यानंतर डॉं. पंजाबराव देशमुख हॉस्पिटल, अमरावती येथे उपचाराकरिता भरती केले व तेथुन पुढील उपचाराकामी नागपुर येथे मेडीकल कॉलेज येथे रेफर केले. तेथे दि. २४.०८.२०२३ रोजी तेजस नंदु मेश्राम याचा म्रुत्यु झाला. वरून पो.स्टे. अजनी, नागपुर येथे मर्ग क्र. ००/२०२३ कलम १७४ जा. फौ प्रमाणे नोंद होऊन सदर तपास डायरी पुढील कार्यवाही करिता पोलीस स्टेशन बडनेरा येथे प्राप्त झाली. पो.स्टे बडनेरा येथे मर्ग क्र. ६२/२०२३ कलम १७४ जा. फौ. प्रमाणे दाखल करण्यात आला. मर्ग चौकशीमध्ये नंदु शामरावजी मेश्राम (म्रुतकाचे वडील) यांनी त्यांचे बयाणात तेजस नंदु मेश्राम, वय १६ वर्षे याचा म्रुत्यु हा डॉं. नंदकिशोर लक्ष्मणराव धुरतकर, रा. जुनी वस्ती बडनेरा, अमरावती यांनी चुकीचा उपचार केल्यामुळे व त्यांच्या निष्काळजीपणामुळे झाला असल्याचे |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | सांगितले. त्या अनुषंगाने डॉं. धुरतकर यांनी केलेल्या उपचाराचे व औषध गोळयांची पाहणी व तपासणी होणेकरिता जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रूग्णालय, अमरावती यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला होता. जिल्हा शल्य चिकित्सक, जि. सा. रू. अमरावती यांनी त्यांच्या चौकशी अहवालात **Dr.Dhuratkar performed procedure out of his purview, without training and knowledge so it can be assumed that Dr. Dhuratkar treated Tejas Meshram negligently**, असा अभिप्राय दिला. अशा प्राप्त अहवालावरून सदरचा गुन्हा दाखल |

- 
- अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | आरोपी अटक आहे/ नाही | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे सिटी कोतवाली अप क्र. ०८/२५ कलम २८१,१२५(a),१२५ (b), Bns सह कलम १३४ MV ACT | जयस्तंभ चौक अमरावती | घ.ता.वेळ दिनांक ०५.०१.२०२५ चे १२.०० वा दरम्यान<br><br>दा.ता.वेळ दिनो ०९.०१.२०२५ चे १९.५८ वा | एक महीला | एंम्बुलंस क्र MH ०४ KF ८३७६ चा चालक | नाही | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांचे काका नामे मनोहर सिताराम सौदागर वय ८० वर्ष रा.स्टेशन परीसर वडरपुरा मुर्तिजापुर येथे एकटेच राहत असुन त्याचे लग्न<br>झाले नाही आहे फिर्यादी योच काका एकटे असल्याने फि. व त्यांचे सर्व बहिण भाऊ हे काकाचे उदरनिर्वाह करतात. फि चे काका मनोहर सौदागर ह नेहमी मुर्तिजापुर वरुन अमरावती येतात परंतु माझ्या घरी न येता ऑफीस मध्ये खर्चाकरीता पैसे घेवुन जातात फि चे काका मुके व बहिरे असुन त्याना बोलता येत नाही. दिनांक ०५.०१.२०२५ रोजी फि ला दुपारी १२.०० वा ते ०१.०० वा दरम्यान पोलीसांचा फोन आला की तुमचे काका याचा जयस्तंभ चौक येथे अपघात झाला वे ईर्वीन येथे वार्ड क्र ३० मध्ये भरती आहे वरुन फि हे लगेच ईर्वीन दवाखाना पोहचले व फी चे काका यांच्या डाव्यापायाला उजव्या पायाला व दोन्ही हाताला व डोक्याला जबर मार लागलेला दिसला वरुन डोक्याचे सिटी स्कॉन काढल्याने त्याची तब्बेत सिरीयस होती म्हणुन ईर्वीन दवाखान येथुन रेफर करुन नागपुर मेडीकल कॉलेज येथे नेवुन भरती केले त्या ठिकाणी त्यांचा उपचार सुरु आहे. तरी भरदाव वेबाने चालवुन फि चे काकांना जखमी केला आहे त्या एंम्बूलेंस चालका विरुध्द कायदेशीर कार्यवाही होणे करीता रिपॉट देत आहे |

इतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | आरोपी अटक आहे/ नाही | चोरी गेला माल/ मिळाला माल | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अपक्र. २९/२०२५ कलम- ५,७, महाराष्ट्र सामाजीक बहिश्कार प्रतिबंधक अधिनीयम | महाराणा प्रताप पंचायत कार्यालय विलास नगर अमरावती | दि. १४/८/२०२४ चे १४.०० वा पासुन ते दि. ९/१/२०२५ चे ०० .०० वा पावेतो | एक महीला | १.दिपक पांडुरंग पवार २. सुदाकर पवार ३. देवेंद्र सुर्यवशी ४. धनराज पवार ५. शैलेश पवार ६. मनिष सुर्यवशी सर्व रा. विलास नगर अमरावती ७. किशोर पवार ८ ज्ञानेशवर पवार ९. खेमराज सोऴके तिन्ही रा. जुनी वस्ती बडनेरा अमरावती १०. देवा पवार रा. तिवसा | -- | | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेऴी व ठिकानी यातील फिर्यादी याचे लग्न करण रामदास चव्हान वय- ३० वर्ष पुर्ण रितीरिवाजा प्रमाणे नमुद ठिकानी सपऩ्न पंचा समक्ष व नातेवाईका समक्ष झाले असुन फिर्यादी ला दोन मुले सुध्दा आहे. परतु फिर्यादीला दुसरा मुलगा झाला तेव्हा फिर्यादी ही तिच्या आई कडे हजर होती तेव्हा तिथे एक ंमहीला ही आली व म्हणाली की, मी तुझ्या नवर्यापासुन गर्भवती आहे. मला तुझ्या नवर्या सोबत लग्न करायचे आहे आता तर तुझ्या नवर्याला मला घरात घ्यावच लागेल असे म्हणुन त्या ंमहीलेनी फिर्यादी च्या पतीवर बलात्काराचा गुन्हा दाखल केला. याबाबत फिर्यादी ने पतीला विचारपुस केली असता फिर्यादी च्या पती ने फिर्यादीस सांगीतले की, माझे लग्ना पुर्वि या महीले सोबत प्रेम संबध होते तीला लग्न बाबत विचारले असता तिने लग्न केले नाही असे फिर्यादी च्या पतीने फिर्यादीस सांगीतले व फिर्यादी ह्याच्या समाजाच्या महाराणा प्रताप पंचायत कार्यालय विलास नगर अमरावती येथे ती ंमहीला यानी तक्रार दिली असुन त्या तक्रारिवरुन फिर्यादी व त्याच्या |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | जि.अमरावती | | | पतीला बोलावुन फिर्यादी च्या पतीला त्या महीले सोबत लग्न कर असे नमुद आरोपीने पंचायत मध्ये सांगतले फिर्यादी च्या पतीने नकार दिला असता फिर्यादी ला व त्याच्या पतीला २ मुलाना नमुद महाराणा प्रताप पंचायत कार्यालय विलास नगर अमरावती ह्याच्या समाजातील नमुद आरोपी हे पचायत म्हणुन तेथे असुन नमुद आरोपीनी फिर्यादी ला व त्याच्या पतीला २ मुलाना समाजा मधुन बाहेर काढले व कोणी जर समाजातील लोक जर फिर्यादी ला व त्याच्या पतीला २ मुलाना ह्याच्याशी बोलले तर तुम्हाला सुध्दा बाहेर काढुन टाकेल असे म्हणुन फिर्यादी ला व त्याच्या पतीला २ मुलाना समाजातुन बाहेर काढले तेव्हा पासुन फिर्यादी ह्याना समजातील व नातेवाईकाने सुद्धा बहिष्कार टाकला.अशा फिर्यादी च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | नागपुरीगेट अप नं ०५/२० २५ कलम २०,२२ एन डी पी एस ॲक्ट | जमजम हॉल व लॉन ची गल्ली दर्गाजवळ नुरनगर रोड अमरावती | दि.०८.०१. २०२४ चे १९.२० वा ते २१.१५ वा. दि.०९.०१. २०२४ चे ००.०५ वा | सरतर्फे पोउपनी विधाते पो स्टे नागपुरीगेट अमरावती शहर | सागर गणपत मसराम वय ३४ वर्ष रा बतरंग टेकडी पो स्टे राजापेठ अम ह मु संजय नांदुरकर यांचे घरी भाडयाने छाया कॉलनी , आदीवासी होस्टेल जवळ | आरोपी अटक आहे | १.हिरवट ओलसर पाला बियासह अंमली पदार्थ गांजा माल वनज ४ किलो ७६० ग्रॅम किंमत ४७,६०० रू २.टि व्हि एस | हकिकत अशा प्रकारे आहे कि,यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पो स्टे हद्दीत पेट्रोलिंग करित असतांना गुप्त माहितीदाराकडुन माहिती मिळाली की यातील आरोपी हा त्याच्या टु व्हिलर मध्ये १.हिरवट ओलसर पाला बियासह अंमली पदार्थ गांजा माल वनज ४ किलो ७६० ग्रॅम किंमत ४७,६०० रू माल घेवुन जात असतांना पो स्टाफ यांनी पकडले व सोबत टि व्हि एस कंपनीची जुपीटर वाहन क्र एम एच २७ बी यु ८०२८किंमत ६०,००० रू असा एकुण १,०७,६०० रू चा माल मिळुन आल्याने सदर आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पो स्टे खोलापुरीगेट अमरावती | | कंपनीची जुपीटर वाहन क्र एम एच २७ बी यु ८०२८किंमत ६०,००० रू असा एकुण १,०७,६०० रू चा माल | |
| ०३ | पोस्टे सिटी कोतवाली अप क्र. ०७/२५ कलम २८५ bns | बस स्टॉंड समोरील आम रास्ता बजरंग बली मंदीरा समोर अमरावती | घ.ता.वेळ दिनांक ०९.०१.२० २५ चे १७.०० वा<br><br>दा.ता.वेळ दिनांक ०९.०१.२० २५ चे १८.३० वा | पोहेकॉ सुनिल ब नं १३४१ पोस्टे सिटी कोतवाली अमरावत शहर | ईरशाद याकुब शेख वय २९ वर्ष रा.चांदुर वाडी चांदुर रेल्वे अमरावत | | -- | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फि हे नमुद घ ता वेळी व ठिकाणी ०९.०० वा ते २१.०० वा बस डेपो येथे ड्युटी असता वपोनी सा यांचे आदेशाने आम्ही व नापोकॉ १२३९ असे पायदळ पेट्रालीग करीत असता नमुद घटनास्थळी आम रस्त्यावर एक व्हान क्र **MH२७ AR** १०७० चे चालक याने त्याचे ताब्यातील व्हॅन आम रोडवर सावजनीक ठिकाणी रहदारीस व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल व येनारे व जाणारे लोकाचे जिवातास धोका निर्माण होईल अशा प्रकारे लावल्याचे दिसल्या वरुन सदर इसमा वर असे बेशिस्त कृत्य करण्याचे कारण विचारले असता त्यासने उडवाउडवीचे उत्तर दिले समाधान कारक उत्तर दिले नाही अशा फि च्या लेखी रि वरुन व डी ओ सा आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

➢ जुगार रेड

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला /मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ०२ | पोस्टे राजापेठ अम. शहर | अप क्रं. ०६/२०२५ कलम १२(अ) मजुका | अवैद्य जुगार | नगदी १७००/- रु. एक बॉल पेन कि.अं. ०५/- रु. व जुगाराच्या चिठठया असा एकुण १७०५/- रु. चा माल | न्यु सातुर्णा भवाणी माता मंदीरा जवळ अमरावती | घ.ता. वेळ ऱ ०९/०१/२०२५ चे १२.३० वा. | दा.ता. वेळ ०९/०१/२०२५ चे १६.२० वा. | सरतर्फे पोहेका पवन तीवारी ब.नं. १४९ पोस्टे राजापेठ अम. शहर | महेंन्द्रा सुरेशराव डाफे वय ४२ वर्ष रा. न्यु सातुर्णा नगर बडनेरा रोड अमरावती | थोडक्यात हकीगत अशा प्रकारे आहे की नमुद घ. ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पोस्टे हददीत पेट्रोलिंग करीत असतांना मिळालेल्या गुप्त माहितीवर पंचासमक्ष जुगार रेड केली असता आरोपी महेंन्द्रा सुरेशराव डाफे वय ४२ वर्ष रा. न्यु सातुर्णा नगर बडनेरा रोड अमरावती चे ताब्यातुन नगदी १७००/- रु. एक बॉल पेन कि.अं. ०५/- रु. व जुगाराच्या चिठठया असा एकुण १७०५/- रु. चा जुगार माल चा मुददेमाल मिळुन आला वरुन आरोपी विरुध्द कलम १२ अ मजुका अन्वये गुन्हा नोंद |
| ०२ | पोस्टे वलगाव. | अप क्र. 08/2025 कलम 12 म.जु. | 01 ते 10 आकड्यावर वरली मटका | वरली मटका जुगारातील नगदि 550/रु व वरली | ग्राम सावरखेडा | दि.09/01/2025 चे 15/30 वा. | दि. 09/01/2025 चे 18/ | सरतर्फे ग्रेड पोउपनि प्रदिप सावरकर | एकनाथ काशीनाथ खोरगडे वय 68 वर्ष रा. सावरखे | हकिकत अशा प्रकारे आहे कि,नमुद घटना ता.वेळी व ठीकानी यातील फिर्यादी यांची पोस्टे ला हजर ड्युटी असतांना गुप्त बातमी दारा कडुन माहीती मिळालीकि, ग्राम सावरखेडा येथे एक ईसम हा 01 ते 10 आकड्यावर वरली मटका जुगार खेळ खेळत आहे. |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | का | जुगार खेळणे | मटका चिठ्या कि.अ. 00/रु | | | 02 वा. | पोस्टे वलगाव अम.शहर. | डा ता.भातकुली जि.अम. | अशा माहीती वरुन आम्ही व सोबत पोकाँ किरण ब.न. 676, 1856, व पंच असे गेलो असत. पोलीसांना पाहुन वरली मटका लावणारे ईसम हे पळुन गेले व वरली मटका लिहनारा ईसम याला जागेवरच पो.स्टाँफ च्या मदतीने पकडुन ताब्यात घेतले. व पंच्या समक्ष त्याची अंग झडती घेतली असता. त्यामध्ये वरली मटका जुगारातील नगदि 550/रु व वरली मटका चिठ्या मिळुन आल्या सदर ईसमाला च्याचे नाव गाव विचारले असता. त्याने त्याचे नाव एकनाथ काशीनाथ खोरगडे वय 68 वर्ष रा. सावरखेडाअसे सांगितले सदर ईसमाचे हे कृत्य कलम 12 अ.मजुका प्रमाणे होत असल्याने त्याचे विरुध्दमाझी कायदेशील फिर्याद आहे. |

- अकस्मात मृत्यु

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण करण्यास गुन्हा दाखल | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | पोस्टे राजापेठ अम. शहर मर्ग क्र. २/२५ कलम १९४ **BNSS** | राहाते घरी महावीर नगर अमरावती घ. ता. वेळ - दि.२१/१/२५ चे ०२.०० ते ०२.३० वा. दा. ता. वेळ दि. ९/१/२५ चे १२.४४ वा. | सुशिलाबाई अण्णाजी ठाकरे वय ७५ वर्षे रा.महावीर नगर | गजानन अण्णाजी ठाकरे वय ५५ वर्षे रा.महावीर नगर अम. | ६५ टक्के जळाल्याने | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांनी पो. स्टे. ला जबाणी रिपोर्ट दिला की ते वर दिलेल्या पत्त्यावर राहतात माझी आई नामे सुशील अण्णाजी ठाकरे वय ७५ वर्षे व माझी पत्नी ज्योती ह्यांचे सह राहाते व सातुर्णा एमायडीसी राघव मार्बल येथे काम करतो दि.२१/१२/२०२४ रोजी दुपारी ०२/०० वा.ते ०२.३० वा.दरम्यान माझे घरमालकीन ने माझी मुलगी दामिनी गजानन ठाकरे हिचे मोबाईल फोन करून माहीती दिली की तुमच्या घरातुन धुपट निघत आहे अशी माहीती देवुन घरमालकीन लव्हाळे यांनी लोकांचे मदतीने रूम खोलली व माझी आई सुशीला बाई हि जळत असल्याचे दिसल्याने तिचे अंगावर पाणि टाकले व घोंगडे टाकले अशी माहीती मला माझ्या मुलीने कंम्पनित फोनद्वारे दिली वरून मी घरी गेलो व माझी आई हिला मित्राचे मदतीने इर्विन दवाखाना येथे ईलाज करणे करिता भरती केले व तिचा ईलाजा दरम्यान आज दि.०९/०१/२०२५ रोजी ०९.०० वा सकाळी डॉ सा नी मृत घोषीत केले माझी आई डोक्याने थोडी कमजोर होतो व तिला डोळयाने कमी दिसत होते माझी पत्नी ज्योती ही घटनेच्या वेळेस भोपाल येथे होती माझे आईला चुकीने आग लागली असावी तिला कोणीही काहीही केले नाही माझा कोणावरही काहीही संशय नाही माझी कोणा विरूध्द काही तक्रार नाही मी पुढील कार्यवाही करिता पो.स्टे.ला रिपोर्ट देत आहे अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदरचा मर्ग दाखल | पो. हवा. १७५७ जिव बांन्डे पो. स्टे. राजापेठ अमरावती |